RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
# शिव वाणी
बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २१ वे | अंक ४९ | सोमवार दि.०९ डिसेंबर २०२४ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-21 | Issue -49 | MONDAY DT.09 DECEMBER 2024 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES

## शिवसेनेच्या दोन मंत्र्यांचा पत्ता कट होणार ?

मुंबई : आगामी मंत्रिमंडळात शिवसेनेच्या दोन मंत्र्याचा पत्ता कट होण्याची दाट शक्यता आहे. शिवसेना आमदार आणि मंत्र्यांचं प्रगती पुस्तक तयार करण्यात आलं असून त्यानुसार अब्दुल सत्तार आणि संजय राठोड यांचं मंत्रिपद हुकणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. तर पाच नव्या चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी मिळण्याची दाट शक्यता आहे. येत्या आठवडाभरात मंत्रिमंडळाच्या निर्णयावर अंतिम शिक्कामोर्तब होणार असल्याची माहिती आहे. राज्यात देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये शिंदेंच्या शिवसेनेला १२ ते १३ रिपदं मिळण्याची शक्यता असल्याचं सूत्रांनी सांगितलं आहे. त्यामध्ये भरत गोगावले, (उर्वरीत पान २ वर)

# पंकजा मुंडेंनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट

### मराठवाड्यातील समस्यांवर, कामगारांच्या स्थलांतरावर झाली चर्चा

प्रतिनिधी । बीड



भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यावेळी मराठवाड्यातून होणाऱ्या स्थलांतरावर पंकजा मुंडे यांनी चर्चा केली. याबद्दलची माहिती पंकजा मुंडे यांनी त्यांच्या सोशल मीडियावर शेअर केली आहे. यावेळी पंकजा मुंडे यांनी मराठवाड्यातील दुष्काळावर देखील चर्चा केली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत भेट घेतल्यावर पंकजा मुंडे यांनी ट्विट करत याबद्दल माहिती दिली आहे. पंकजा मुंडे म्हणाल्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मी अभिनंदन केले. तसेच यावेळी मराठवाड्याच्या मुद्द्यांवर, विशेषतः दुष्काळ निर्मूलन आणि काही भागातील बेरोजगारी सोडवण्याच्या मुद्यावर चर्चा केली. महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या मागास भाग आणि बीडमधील स्थलांतरित कामगारांच्या समस्यांकडे विशेष लक्ष देण्याचे आश्वासन यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याची माहिती पंकजा मुंडे यांनी दिली आहे.दरम्यान, पंकजा मुंडे यांची मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची देखील शक्यता वर्तवली जात आहे. तसेच पंकजा मुंडे यांची देखील मंत्रिपद मिळवण्याची इच्छा असल्याचे बोलले जात आहे. मराठवाड्याला भाजपकडून दोन मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. यात पंकजा मुंडे यांचे नाव आघाडीवर आहे. पंकजा मुंडे यांच्यासोबतच भाजप आमदार अतुल सावे यांना देखील मंत्रिपद मिळू शकते. येत्या ४-५ दिवसात मंत्रिपद कोणाला मिळणार हे निश्चित होणार आहे. राज्यात महायुती सरकार आल्यावर ५ तारखेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचा शपथविधी पार पडला आहे. आता मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच कोणाला मंत्रिपद मिळणार याकडे सुद्धा लक्ष असणार आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांना मंत्रिपद मिळणार असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

## आता २०२६-२७ पासून 'बीएड' चा कालावधी पुन्हा एक वर्षाचा होणार!

पुणे : राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने बीएड म्हणजेच बॅचलर ऑफ एज्युकेशनच्या अभ्यासक्रमामध्ये काही बदल सुचवले होते. त्यानुसार आता बी.एड.चे स्वरूप, कालावधी आणि अभ्यासक्रम २०२६-२७ पासून बदलणार आहे. हा अभ्यासक्रम पुन्हा एक वर्षाचा होणार आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत हा बदल होत आहे. टीईटी अर्थात शिक्षक पात्रता चाचणीच्या नियम आणि निकषांमध्येही बदल केले जाणार आहेत. हे बदल २०२७ मध्ये चार वर्षाच्या एकात्मिक पदवी उमेदवारांच्या बॅचच्या आधी केले जातील. शैक्षणिक धोरणांतर्गत, पायाभूत, पूर्वतयारी, मध्यम आणि माध्यमिक स्तर या चार भागांनुसार शिक्षक तयार केले जातील. पदवीपूर्व अभ्यासक्रमातील बदलांमुळे विविध बीएड कार्यक्रम पुन्हा सुरू केले जात आहेत. बीएड महाविद्यालयांसाठी नवीन बदलांची अधिसूचना लवकरच जारी केली जाणार आहे. यामध्ये चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. चार वर्षांचा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना एका वर्षात बी.एड.साठी प्रवेश घेता येईल.





तीन वर्षांच्या पदवीधर विद्यार्थ्यांना दोन वर्षांतील बी. एड. साठी प्रवेश मिळेल. पदवीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना लाभ मिळणार आहे. पदवीनंतर शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना लाभ मिळेल. चार वर्षांचे एकात्मिक बी. एड. आणि दोन वर्षांचे बी. एड. शिकणारे विद्यार्थी एम.एड. च्या पदवीसाठी प्रवेश घेऊ शकतील.

# ज्येष्ठ पत्रकार विनायक वैद्य यांना पुत्रशोक

### द्वारकाधीश मित्र मंडळाचा वाघ वैभव वैद्य अनंतात विलीन

प्रतिनिधी । बीड

द्वारकाधीश मित्र मंडळाचा वाघ, एक धाडसी युवा नेतृत्व म्हणून सर्वत्र परिचित असलेले वैभव विनायक वैद्य यांचे अल्पशा आजाराने मुंबई येथील ज्यूपिटर हॉस्पिटल मध्ये उपचार घेत असताना रविवार दिनांक ८ डिसेंबर २०२४ रोजी पहाटे ४:३० वाजता दुःखद निधन झाले. मृत्यू समयी ते अवघ्या ३७ वर्षाचे होते.त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ५ वाजता बीड येथील अमरधाम स्मशानभूमी येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यविधीस सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.युवावर्ग, द्वारकाधीश मित्र मंडळ आणि वैभव वैद्य यांच्या मित्रांना अवघड झाले होते.



बीड शहरातील धोंडीपुरा जव्हेरीगल्ली भागात राहणारे वैभव विनायक वैद्य हे बीड जिल्हा मराठी पत्रकार संघ बीडचे सचिव व बीड शहरातील जेष्ठ संपादक पत्रकार विनायक वैद्य यांचे चिरंजीव होते. वैभव वैद्य हे द्वारकाधीश मित्र मंडळाचे विश्वस्त आणि परशुराम गुरखुदे यांचे अत्यंत विश्वासू सर्वस्वी मित्र म्हणून युवकात प्रसिद्ध होते. ते जगदीश गुरखुदे यांच्या परिवारातीलच एक अविभाजक घटक सदस्य होते.कोणत्याही गरजवंतांच्या कामाला धाडसाने धावून जाणारे नेतृत्व म्हणून वैभव वैद्य यांची वेगळी ओळख होती. सर्व जाती धर्मातील सामाजिक आणि धार्मिक कार्यामध्ये त्यांचा सक्रिय उत्स्फूर्त सहभाग असायचा. छत्रपती शिवाजी महाराज जयंती, स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती, गणेश उत्सव, राम जन्म उत्सव व इतर अनेक धार्मिक कार्यात ते विविध उपक्रमांच्या माध्यमातून उस्फूर्तपणे सहभाग घेत असत. युवकांचे मोठे नेटवर्क संघटित करून द्वारकाधीश मित्र (उर्वरीत पान २ वर)

## कारच्या धडकेत दुचाकीस्वार तरुण ठार

### महिला जखमी:चालकाला डुलकी लागल्याने केज-कळंब रस्त्यावर अपघात

प्रतिनिधी । केज

कार चालकाला डुलकी लागल्याने भरधाव कारची समोरून आलेल्या दुचाकीला जोराची धडक बसली. या अपघातात दुचाकीवरील तरुण व महिला जखमी झाले. उपचारादरम्यान दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. हा अपघात केज - कळंब रस्त्यावर माळेगावजवळ शनिवारी सायंकाळी सहा वाजता घडला.

(उर्वरीत पान २ वर)

## तानाजी सावंतांना मंत्रीमंडळात स्थान देऊ नका

### त्यांची चौकशी करा, ठाकरे गटाच्या आमदाराची फडणवीसांकडे मागणी



प्रतिनिधी । बीड

बीडच्या अंबाजोगाई येथील शासकीय स्वराती रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याच मुद्यावरुन शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सुनिल प्रभू यांनी सत्ताधाऱ्यांवर आणि तात्कालीन आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्यावर टीका केलीय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सगळ्याच प्रकरणाची चौकशी करावी. तसेच त्यावळचे तत्कालीन मंत्र्याची सुद्धा चौकशी (उर्वरीत पान २ वर)

# वाद मिटवण्यासाठी गेलेल्या तरुणावर तलवारीने हल्ला

### अंबाजोगाई तालुक्यातील पोखरी येथील घटना, तिघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । अंबाजोगाई

जुन्या वादावर बोलून मध्यस्ती करण्यासाठी गेलेल्या तरुणावर तीन भावांनी तलवारीसह लाठ्या-काठ्यांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना तालुक्यातील पोखरी गावात घडली असून या प्रकरणी तिघांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनोद वसंत ढवारे (३०, (उर्वरीत पान २ वर)



# संपादकीय

## अन्नदात्यासाठी हवी संवेदनशीलता

उत्तर प्रदेश सरकारच्या नोएडा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेनंतर शेतकऱ्यांनी सरकारला आठवडाभर, म्हणजे सहा डिसेंबरपर्यंतची मुदत देण्याचे मान्य केले. मात्र, हे शेतकरी अद्याप आपापल्या गावी परतले नसून, ग्रेटर नोएडा भागातील दलित प्रेरणा स्थळीच त्यांनी ठिय्या दिला आहे.

देशाचा अन्नदाता असलेल्या शेतकऱ्यांनी राजधानी दिल्लीच्या सीमेवर पुन्हा एकदा धडक दिली आहे. या वेळी नोएडा भागातील भूसंपादनाच्या निषेधार्थ आणि कृषी उत्पादनाला किमान आधारभूत किंमतीच्या म्हणजेच हमीभावाच्या (एमएसपी) कायद्यासह इतर मागण्यांसाठी उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांनी दिल्लीवर मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. उत्तर प्रदेश सरकारच्या नोएडा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेनंतर शेतकऱ्यांनी सरकारला आठवडाभर, म्हणजे सहा डिसेंबरपर्यंतची मुदत देण्याचे मान्य केले. मात्र, हे शेतकरी अद्याप आपापल्या गावी परतले नसून, ग्रेटर नोएडा भागातील दलित प्रेरणा स्थळीच त्यांनी ठिय्या दिला आहे.

महिला शेतकऱ्यांची लक्षणीय संख्या, हे या वेळच्या आंदोलनाचे वेगळेपण. दुसरीकडे हमीभावासह इतर मागण्यांसाठी पंजाबच्या शंभू सीमेवर गेले अनेक महिने आंदोलन करणाऱ्या पंजाब आणि हरियाणाचे शेतकरी आंदोलकही सहा डिसेंबरलाच दिल्लीकडे कूच करण्याच्या तयारीत आहेत. कोणत्याही आंदोलनाकडे सुरुवातीला दुर्लक्ष करण्याची, त्यांचा उपहास करण्याची प्रवृत्ती आपल्याकडे दिसते. येथेही तसेच झाले. नोएडातील भूसंपादनाच्या निषेधार्थ शेतकरी आधीच यमुना प्राधिकरणाच्या कार्यालयासमोर निदर्शने करीत होते; मात्र प्राधिकरणाने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. पोलिस, जिल्हा दंडाधिकारी, ग्रेटर नोएडा प्राधिकरण, नोएडा प्राधिकरण आणि यमुना प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत महत्त्वाच्या मागण्या मान्य करण्यास नकार दिला गेला.

यामुळे संतप्त शेतकरी मोर्चाची घोषणा करून संसदेकडे निघाले. नोएडातील भूसंपादनासाठी तुलनेने चौपट मोबदला, भूसंपादनाच्या बदल्यात १० टक्के भूखंड आणि शेतकऱ्यांना ६४.७ टक्के दराने भरपाई, जमीनदार आणि भूमिहीन शेतकऱ्यांच्या मुलांना रोजगार आणि पुनर्वसनाचे सर्व फायदे, शेतकरी आणि शेतमजुरांना निवृत्तीवेतन, २०२०-२१ मध्ये दिल्लीच्या सीमांवर झालेल्या शेतकरी आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना भरपाई व तेव्हा पोलिसांनी नोंदवलेले गुन्हे मागे घ्यावेत, लखीमपूर खेरी हिंसाचारातील पीडितांना न्याय, भूसंपादन कायदा २०१३ची पुनर्स्थापना करावी, या शेतकऱ्यांच्या मागण्या आहेत.

शेतकरी आंदोलन म्हटले, की दिल्लीकरांना धडकी भरते, याचेही प्रत्यंतर सोमवारी आले. शेतकऱ्यांनी आंदोलनाचा नुसता इशारा दिला, की दिल्ली पोलिस साऱ्या सीमांपासून दिल्लीभर अडथळ्यांची मालिकाच उभी करतात. त्यामुळे जागोजागी वाहतूक कोंडी होते. शेतकऱ्यांचे आंदोलन पुन्हा तापत असताना केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सामोपचाराची भूमिका घेतली हे स्वागतार्ह आणि परिपक्वतेचे द्योतक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली कृषी मंत्रालय सहा कलमी कृती आराखड्यावर काम करत असून आपण कोणत्याही विषयावर चर्चा करू, अशीही तयारी चौहान यांनी दाखवली.

# श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित बी फार्मसी महाविद्यालयास नॅक समितीकडून 'बी प्लस' मानांकन प्राप्त

**प्रतिनिधी । अंबाजोगाई**

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या बी फार्मसी महाविद्यालयास नुकतीच नॅक समितीने भेट देऊन महाविद्यालयातील संपूर्ण अभ्यासक्रम व तेथील सुविधांची तपासणी केली होती . या संपूर्ण तपासणी अंती या समितीने बी फार्मसी महाविद्यालयास समितीचा इ+ हा दर्जा प्रदान केल्याचे पत्र दिले आहे. अंबाजोगाई शहरातील हे महाविद्यालय फार्मसी क्षेत्रातील बीड जिल्ह्यामधिल पहिले नॅक मूल्यांकन प्राप्त महाविद्यालय ठरले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की दि २५ व २६ नोव्हेंबर रोजी बंगळूर येथील राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषद (नॅक) समितीकडून या महाविद्यालयास भेट देऊन पाहणी करण्यात आली होती. दोन दिवस चाललेल्या या भेटीदरम्यान समितीने महाविद्यालयातील सर्व विभागांचे ज्यामध्ये शैक्षणिक उपक्रम, भौतिक सोयी-सुविधा, नवीन उपक्रम, विद्यार्थ्यांची प्रगती, प्रशासकीय बाबी, विद्यार्थी व पालक यांच्याशी संवाद अशा अनेक गोष्टींची पाहणी व पडताळणी केली होती. बी फार्मसी महाविद्यालयास पहिल्यांदाच नॅक समितीचे मानांकन मिळाल्यामुळे संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाकडून २०१० साली बी फार्मसी महाविद्यालय सुरू केले आहे. तेव्हापासून या महाविद्यालयात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व गुणवत्तापूर्ण शिक्षण असण्यासोबतच ते शिक्षण सामाजिकदृष्ट्या संवेदनशील असावे असे संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर कांताप्रसाद मोदी यांचे ध्येय आहे. आजपर्यंत या महाविद्यालयातुन अनेक विद्यार्थ्यांनी आपले येथील शिक्षण पूर्ण करून त्यापुढील उच्च शिक्षण विविध प्रदेशात घेत आहेत. त्यामधील अनेक विद्यार्थी हे यशस्वी उद्योजक झाले असून अनेक विद्यार्थी विविध ठिकाणच्या प्रशासकीय सेवेत त्याचबरोबर बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये अनेक विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत.

स्थापनेपासूनच या संस्थेने आपल्या अनुभवी व तज्ञ शिक्षक तथा प्राध्यापक यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात हातभार लावला आहे. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.पडताळणीसाठी आलेल्या नॅक समितीने महाविद्यालयाच्या संपूर्ण कामकाजाची पाहणी केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी यावेळी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांची सखोल अशी माहिती समितीस देतांना महाविद्यालयाचा नयनरम्य नैसर्गिक परिसराबाबत देखील अवगत केले.महाविद्यालयातील या सर्व बाबी व निकष यावरून या महाविद्यालयास इ+ हा दर्जा बहाल केला आहे.महाविद्यालयाने संपादित केलेल्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, अध्यक्ष भूषण मोदी, व्यवस्थापकीय संचालक संकेत राजकिशोर मोदी तसेच संस्थेचे मार्गदर्शक असलेले प्राचार्य डॉ बी. वाय. खडकभवी, प्रा. व्ही. बी. चव्हाण व प्रा.डी. एच. थोरात यांनी प्राचार्य डॉ. संतोष तरके तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व त्यांच्याबरोबरच विद्यार्थी पालक तथा माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




# टाकळी येथे लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या ७५ व्या जयंती निमीत्ताने
## किर्तन सेवा व महाप्रसादाचे आयोजन

**प्रतिनिधी । केज**

केज तालुक्यातील टाकळी येथे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७५ व्या जयंती निमीत्ताने सोमवार दि.०९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०-०० ते १२-०० यावेळेत आळंदी देवाची येथील सुप्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. अदिनाथ महाराज लाड यांच्या हरीकिर्तनाचा कार्यक्रम श्री विठ्ठल - रुक्मीनी मंदिर टाकळी येथे आयोजित करण्यात आला असुन हरिकिर्तना नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे तरी पंचक्रोशीतील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन युवा नेते सुरज रामकृष्ण घुले यांच्या वतीने करण्यात आले आहे.महापुरुष अथवा महामानवाची जयंती ही त्यांच्या विचारा प्रमाणे व्हावी असा आपला मानस असुन अशा कार्यक्रमाला वायफळ खर्च करण्या पेक्षा त्यांच्या विचारांची संबंधित उपक्रम घेऊन साजरी केली जावी असे आपले मत आहे व आपण हा प्रयत्न सतत चालू ठेवणार असल्याचे युवानेते सुरज रामकृष्ण घुले यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# केज येथील जेष्ठ विधीज्ञ साहेबराव डोंगरे यांचे दुख:द निधन



**प्रतिनिधी । केज**

केज येथील जेष्ठ विधीज्ञ साहेबराव नामदेवराव डोंगरे यांचे दुखःद निधन झाले आहे.केज तालुक्या तील मूळ कोठी येथील रहिवाशी असलेले केज शहरातील नामांकित विधीज्ञ साहेबराव नामदेवराव डोंगरे यांचे सोमवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले.दोन दिवसांपूर्वी अंबेजोगाई येथील रुग्णालयात त्यांना उपचारासाठी नेण्यात आले होते.एके काळी केज कोर्टातील जेष्ठ व नामांकित विधीज्ञ म्हणून त्यांची ओळख होती.

त्यांच्यावर आज सकाळी आठ वाजता त्यांच्या मूळ कोठी गावी अंत्यसंस्कार पार पडतील.त्यांना केज वासीयांनी भावपूर्ण आदरांजली व्यक्त करण्यात आहे.

# स्वराज्य नगर,गणपत नगर,पंचशीलनगर मध्ये एक कोटीच्या विकास कामाचा शुभारंभ

## बीड शहरात दर्जेदार रस्ते निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील - सचिन मुळूक

**प्रतिनिधी । बीड**

शहरातील स्वराज्य नगर,गणपत नगर,पंचशीलनगर भागातील रस्त्यांचा प्रश्न अनेक दिवसांपासुन प्रलंबित होता. शिवसेनेचे मुख्य नेते तथा तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या भागातील रस्त्यासाठी एक कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला होता. आता रस्त्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल. आता पुन्हा राज्यात महायुती सरकार स्थापन झाले असून शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील रस्त्यांसाठी भरीव निधी आणून दर्जेदार रस्ते निर्माण करण्यासाठी कायम प्रयत्नशिल असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.

शहरातील स्वराज्य नगर,गणपत नगर,पंचशीलनगर भागातील रस्ते, नाली व विकास कामांचा शुभारंभ रविवारी (दि.८) शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या प्रयत्नामुळे शहरातील स्वराज्य नगर, गणपत नगर भागातील अत्यंत महत्त्वाचा मुख्य रस्ता व नाली कामासाठी ६५ लक्ष रुपये व पंचशीलनगर भागातील विश्वरत्न कॉलनी येथे रस्ता व नाली साठी ३५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली. पुढे मुळूक म्हणाले की, शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात राज्यात अनेक विकास कामे झाली. त्याचाच एक भाग म्हणून आज या भागातील रस्त्यासाठी निधी मिळाला असून आज प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली. राज्यात पुन्हा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार आले असुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील रस्ते व विकास कामांसाठी आणखी भरीव निधी आणून दर्जेदार रस्ते निर्मितीवर आमचा भर राहणार असल्याचे मुळूक म्हणाले.


पान१ वरून...


**कारच्या धडकेत...**

अशोक मारुती चिरके (२५, रा. माळेगाव) व वनिता धर्मराज गायकवाड (५०, रा. सुकळी) हे दोघे शनिवारी सायंकाळी ६ वाजता शेतातील कामे उरकून घराकडे दुचाकीवरून (एम. एच. ०५ ए.ई. ११९२) घराकडे निघाले होते. केजकडून कळंबकडे भरधाव वेगात निघालेल्या कारच्या (एम. एच. २३ बी. सी. ६३८३) चालकाला झोपेची डुलकी लागल्याने कारचे नियंत्रण सुटून उजव्या बाजूने चालणाऱ्या दुचाकीला समोरून जोराची धडक दिली. दुचाकी ही २० फूट फरफटत गेली.

या अपघातात अशोक चिरके याच्या कमरेला व पायाला गंभीर दुखापत झाली. मागे बसलेल्या वनिता गायकवाड या देखील जखमी झाल्या. अपघातानंतर कार ही रस्त्याच्या बाजूला पंधरा फूट खड्ड्यात जाऊन पडली. गावातील तरुणांनी जखमींना उपचारासाठी अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान दुचाकीस्वार अशोक चिरके या तरुणाचा मृत्यू झाला. कार ही दुचाकीला धडक देत रस्त्याच्या बाजूच्या १५ फूट खड्ड्यात जाऊन पडली. कारची एअर बॅग उघडल्याने कारमधील दोन महिला, दोन पुरुष व लहान मुलगा यांना सुदैवाने गंभीर दुखापत झाली नाही.

**शिवसेनेच्या दोन ....**

संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, अर्जुन खोतकरांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडू शकते अशीही चर्चा आहे. त्याचवेळी अब्दुल सत्तार आणि संजय राठोड यांना मात्र मंत्रिपदापासून मुकावं लागणार असल्याची चर्चा आहे.

नागपुरातील हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळ विस्तार करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. त्यामुळे आठवडाभरात मंत्रीमंडळ विस्तार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मंत्रीपदासाठी निवडलेल्या नावांवर दिल्लीत चर्चा होणार असल्याचंही बोललं जात आहे.

शिवसेनेत निकष लावून मंत्रिपदं?

शिवसेनेच्या मंत्रिमंडळात यंदा मोठे बदल दिसण्याची शक्यता आहे. यावेळेस एकनाथ शिंदे कठोर निकष लावून मंत्रिपदाची माळ गळ्यात घालणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे जे पात्र असतील, पक्ष संघटना वाढवतील त्यांनाच मंत्रिमंडळात स्थान दिलं जाईल अशीही चर्चा आहे.

गेल्या अडीच वर्षात ज्यांना मंत्री पद किंवा महत्त्वाची खाती दिली त्यांनी दोन्ही निवडणुकीत कसे काम केले? पक्ष संघटनेच्या वाढीसाठी काय योगदान दिले? निवडणुकीच्या प्रचारात किती साथ दिली? फक्त स्वतःचा मतदारसंघ सांभाळला की इतर ठिकाणी फिरले? असे सर्व निकष लावले जाणार असल्याची माहिती आहे. केवळ जेष्ठतेच्या मुद्द्यावर किंवा बंडात साथ दिलेल्या मुद्द्यावर यावेळी मंत्रिपद दिले जाणार नाही अशी माहिती आहे.

**ज्येष्ठ पत्रकार...**

मंडळाच्या माध्यमातून त्यांनी परशुराम गुरखुदे यांच्या पाठीशी मोठी ताकद उभा केली होती. युवक वर्गात त्यांची एक वेगळी छबी आणि दरारा होता.मागील आठवड्यामध्ये वैभव वैद्य यांना अचानक अस्वस्थ्य वाटू लागल्याने बीडच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र प्रकृती जास्त खालवल्याने त्यांना ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांची प्रकृती जास्तच बिघडल्याने प्राणज्योत मावळली. त्यांच्या दुःखद निधनाच्या वृत्तावर विश्वासच बसत नाही. एक हरहुन्नरी, हजरजबाबी, निर्णय घेण्याची तात्काळ क्षमता असलेला धाडसी युवा नेता अशा पद्धतीने अचानक जाईल असे स्वप्नातही वाटत नव्हते. वैभव वैद्य यांच्या अचानक निधनाने द्वारकाधीश मित्रपरिवार मात्र पोरका झाला आहे. त्यांच्या पश्चात वडील पत्रकार विनायक वैद्य, आई, पत्नी, एक मुलगा, चार बहिणी, मेव्हणे, द्वारकाधीश असा मोठा परिवार आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. वैद्य कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

**तानाजी सावंतांना..**

करावी अशी मागणी प्रभू यांनी केली आहे.

तानाजी सावंत यांना मंत्रिमंडळात घेऊ नये

दरम्यान, या प्रकरणामध्ये जे जे अधिकारी यामध्ये होते त्यांना शिक्षा करावी. कारण ते रुग्णांच्या जीवाशी खेळले आहेत असेही ते म्हणाले. तानाजी सावंत मागील अडीच वर्ष या पदावर होते. त्यांनी मागील एका वर्षात यावर काहीच कारवाई केली नाही. त्यामुळं मी देवेंद्र फडणवीस यांना विनंती करतो की, मंत्री सुद्धा यामध्ये असतील तर त्यांना मंत्रिमंडळ विस्तारात घेऊ नये असे प्रभू म्हणाले. ठाणे भिवंडीमध्ये या सगळ्या रॅकेटचे कनेक्शन असल्याचे प्रभू म्हणाले. जे जे कोणी या सगळ्यामध्ये आहेत. त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत असंही प्रभू म्हणाले.

दरम्यान, एका बाजुला मंत्रिमंडळ विस्तारात आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत यांना पुन्हा एकदा समाविष्ट करण्याची मागणी कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. तसेच त्यांना पुन्हा आरोग्य मंत्रीपद द्यावे असीही मागणी होतेय. या मागणीसाठी आज पंढरपुरातील नामदेव पायरी येथे शेकडो वारकऱ्यांनी भजन करीत विठुरायाला साकडे घातले. यावेळी विठ्ठलाच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला. आषाढी व कार्तिकी या दोन महायात्रांमध्ये वारकऱ्यांसाठी मोफत महा आरोग्य शिबिर राबवल्याने लाखो वारकऱ्यांना याचा लाभ झाला होता. यामुळेच पुन्हा यंदाच्या मंत्रिमंडळ विस्तारात सावंत यांच्याकडे आरोग्यमंत्रीपद देण्यात यावे व अशीच वारकऱ्यांची सेवा महायुती सरकारकडून घडावी अशी मागणी वारकरी संप्रदायातील महाराजांनी केली आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला तानाजी सावंत यांनी मंत्रीमंडळात संधी देऊ नये अशी मागणी करण्यात येत आहे.

नेमकं प्रकरण काय?

स्वाराती रुग्णालयातील ॲझिमसिम ५०० या गोळीचे नमुने, १० ऑगस्ट २०२३ रोजी तत्कालीन औषध निरीक्षक श्रीकांत पाटील यांनी तपासणीसाठी घेतले होते. मुंबईच्या प्रयोगशाळेकडून याचा तपासणी अहवाल एक वर्षानंतर, १८ ऑक्टोबर २०२४ रोजी मिळाला. ई-टेंडरिंगद्वारे २५ हजार ९०० गोळ्यांचा पुरवठा कोल्हापूरच्या विशाल एंटरप्रायजेसने, २९ जुलै २०२३ रोजी केला होता. आता हा पुरवठा स्वराती रुग्णालयात शिल्लक नसून ही कंपनीच अस्तित्वात नसल्याचं तपासात उघड झालं आहे. काबीज जेनेरिक हाऊस विरोधात बनावट औषध पुरवठ्याबाबत यापूर्वी वर्धा व भिवंडी येथेही गुन्ह्याची नोंद आहे. संचालक विजय चौधरीला भिवंडी पोलिसांनी अटक केली आहे. आंतरराज्य टोळीचा यात समावेश असण्याची औषध विभागाला शंका आहे. ही कंपनीच दिलेल्या पत्त्यावर अस्तित्वातच नसल्याचे समोर आले आहे..

**वाद मिटवण्यासाठी...**

रा. पोखरी, ता. अंबाजोगाई) असे हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.

पोलिसांनी या प्रकरणी सुरज वाघमारे यास अटक केली असून अन्य दोन आरोपी फरार आहेत. या प्रकरणी पोखरी गावातील तरूण विनोद ढवारे याने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, वाद चर्चेतून मिटविण्यासाठी विनोद, विलास कुराडे, विनोद बलवंत आणि त्याचा भाऊ आकाश हे बुधवारी रात्री ८ वाजता सुरज वाघमारे याच्या घराकडे गेले. त्या ठिकाणी वाद मिटवण्यासाठी चर्चा सुरु असताना सुरज याने घरात जावून तलवार आणत विनोदवर हल्ला केला. यावेळी संतोष आणि शिवम यांनी विनोदला दांड्याने मारहाण केली. यावेळी विनोद सोबत आलेल्या ग्रामस्थांनी त्याला हल्लेखोरांच्या तावडीतून वाचवले. या प्रकरणी सुरज संतोष वाघमारे, मनोज संतोष वाघमारे आणि शिवम संतोष वाघमारे या तिघांवर गुन्हा नोंदवण्यात आला.




**प्रतिनिधी । केज**

शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाच्या केज तालुका प्रमुख पदावर निवड झाल्या बद्दल केज सराफ असोसिएशनच्या वतीने चैतन्य ज्वेलर्सचे मालक मोहनराव धपाटे,गोविंद कणसे यांच्या सह पदाधिकारी व मित्र परिवार यांच्या वतीने शाल,श्रीफळ,फेटा देऊन सत्कार करण्यात आला. तसेच अभिनंदन करुन पुढील वाटचालीस हार्दीक शुभेच्छा दिल्या आहेत.


हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत). का.संपादक : शेख आयेशा

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122 (MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात संत श्री संताजी जगनाडे महाराजांची जयंती साजरी

## जगनाडे महाराजांचे विचार आणि साहित्य प्रेरणादायी सामाजिक बांधिलकी जपत ऐक्याचा संदेश देणारे :- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी ।** बीड

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.०८ रविवार रोजी संत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रगतिशील शेतकरी सुदाम रणखांब यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत कर्मचारी जीवन मुळे, सुखदेव वाणी, कचरू निर्मळ,मधुकर रणखांब, जयदेव गिरे, शेषेराव थोरात आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे



प्रास्ताविक व सूत्रसंचालन मधुकर रणखांब यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष बालासाहेब जाधव यांनी आभार मानले.

श्री संत संताजी जगनाडे यांच्या महतीचा जीवनपट उलगडताना त्यांचे वारकरी संप्रदायाचे विचार आणि साहित्य हे प्रेरणादायी असुन सामाजिक बांधिलकी आणि ऐक्याचा संदेश देणारे आहे.जगदगुरू संत तुकाराम महाराज यांच्या जीवनकार्याचा मोठा प्रभाव त्यांच्या मनावर होता.तुकाराम महाराजांच्या किर्तनातील प्रमुख १४ टाळक-यांपैकी प्रमुख असणारे संताजी जगनाडे महाराज यांना तुकाराम महाराजांच्या गाथा इंद्रायणी नदीमध्ये बुडवल्यानंतर सुद्धा त्याचे पुन:र्लेखन जगनाडे महाराजांनी केल्याने आपणास त्यांची महती कळत असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी प्रतिपादन केले.



बीड : शहरातील पेठ बीड भागातील श्री.संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या मंदिरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आरती केली. यावेळी समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# स्वयंघोषित संघटन काढून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न- तालुकाध्यक्ष पांचाळ

**प्रतिनिधी ।** माजलगांव

मागील दोन दिवसांपूर्वी वर्तमानपत्रातून प्रभु विश्वकर्मा संघटनेच्या तालुकाध्यक्ष पदी शामसुंदर पांचाळ यांची निवड झाल्याचे प्रकाशित झालेले वृत्त चुकीचे असून नियमबाह्य संघटनेचा आणि विश्वकर्मा सुतार समाज संघटनेचा संबंध नसुन स्वयंघोषित संघटन काढून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न असल्याचे विश्वकर्मा सुतार संघटनेचे अधिकृत माजलगांव तालुकाध्यक्ष परमेश्वर(आमसुले)पांचाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले



आहे.

ते म्हणाले आहे कि,कुठल्याही संघटनेच्या पदाधिकारी निवडी अगोदर आधीच्या पदाधिकारी यांचे राजीनामे देणे बंधनकारक असते.मात्र काही अतिउत्साही समाज बांधवांनी हे सर्वच नियम बाजूला सारून आपले वैयक्तिक हित पाहून आणि समाजात फूट पाडण्यासाठी थोडसं नाव बदल करून स्वयंघोषित संघटन काढून स्वतःच्या स्वार्थासाठी आणि इतर समाजाला विश्वासात न घेता अध्यक्ष झाल्याचा कांगोवा केला,ही बाब पूर्णपणे समाज विरोधी आहे.

त्यामुळे या स्वयंमघोषित संघटनेचा आणि श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटनेचा जी संघटना केवळ आणि केवळ समाजाच्या सर्व अडीअडचणी साठी कार्यरत असते.त्या संघटनेचा या अनधिकृत व स्वयंघोषित अध्यक्ष शामसुंदर पांचाळ यांचा काहीही संबंध नाही.या पदाधिकारी यांच्याशी कसल्या प्रकारचे आर्थिक व्यवहार करू नये,असे आवाहन विश्वकर्मा सुतार संघटनेचे अधिकृत माजलगांव तालुकाध्यक्ष परमेश्वर (आमसुले)पांचाळ,उपाध्यक्ष राजेभाऊ पांचाळ,सचिव अशोक दिगांबरे,राजेभाऊ रिधोरीकर,लक्ष्मण पांचाळ, सुभाष नन्नवरे,संतोष रत्नपारखे,वैजनाथ पांचाळ, बालाजी पांचाळ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# जगन्नाथ मेनकुदळे यांचे निधन

**प्रतिनिधी ।** अंबाजोगाई

**येथुन जवळच असलेल्या मौजे होळ ता केज जिल्हा बिड येथील जगन्नाथअप्पा महादेव मेनकुदळे ( वय _७४)हे होळेश्वर विद्यालयात प्रयोग शाळा सहायक या पदावर कार्यरत असलेल्या**



व गेली पंधरा वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झालेले जगन्नाथअप्पा यांचे ७ डिसेंबर २०२४ रोजी निधन झाले,अप्पा हे एक वर्षापासून आजारी होते,त्यांचा स्वभाव अत्यंत विनम्र,शांत, मितभाषी स्वभावाचे असल्याने होळ येथे त्यांना आप्पा म्हणून संबोधले जात होते, जगन्नाथ अप्पांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे,

# आमदार सुरेश धस यांना बीडचे पालकमंत्री करावे-विनोद सरोदे

**प्रतिनिधी ।** आष्टी

विधानसभा मतदारसंघांचे नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांना मंत्री पदाची जबाबदारी देऊन बीड जिल्ह्याचे पालकमंत्री करावे अशी मागणी विनोद सरोदे यांनी केली आहे.गोर गरीब जनतेच्या अडी अडचणी व समस्या सोडविण्यासाठी कधीही सेवेत असतात. जनतेच्या विकासासाठी व सेवे साठी कायम तत्पर असलेले खंबीर नेतृत्व म्हणजे सुरेश अण्णा धस हे आहेत.जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी धडाडीचे व डॅशिंगबाज नेतृत्व म्हणून आमदार सुरेश धस यांचे कडे पहिले जाते. त्यांचे काम हे सर्वसामान्य लोकांना आवडते,आमदार सुरेश अण्णा धस हे हिंदू -मुस्लिम,ओ.बी.सी.मराठा, दलित यांच्या सोबतच सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत



एकत्र घेऊन काम करतात,त्यांचे कडे जातपात धर्म हे कधिही पहिले जात नाही.शिवाय सर्व जातीधर्माच्या लोकांना कोणत्या ना कोणत्याही पदावर काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात डॅशिंग बाज, व बीड जिल्ह्याच्या विकासासाठी सदैव झटणारे नेतृत्व म्हणजे आमदार सुरेश अण्णा धस हे आहेत. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी लागेल तेवढा विकासनिधी खेचून आणण्यासाठी आमदार सुरेश धस यांचे शिवाय बीड जिल्ह्याला पर्याय नाहीय.त्यामुळे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती आहे कि त्यांनी भाजप चे आमदार सुरेश धस यांना मंत्री पद देऊन बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पदही देण्यात यावे अशी मागणी विनोद सरोदे यांनी केली आहे.

# सुनिता जोशी यांची आखिल भारतीय पैशवा संघटनेच्या वकिल आघाडी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदि नियुक्ती जाहिर

**प्रतिनिधी ।** अंबाजोगाई

सौ सुनीता अभयराव जोशी - देशपांडे यांची अखिल भारतीय पेशवा संघटनेच्या वकील आघाडी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदी नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे हि निवड संघटनेचे*संस्थापक अध्यक्ष सचिन वाडेपाटील* यांच्या आदेशाने व राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री लक्ष्मीकांत दडके, श्री मोरेश्वर मार्डीकर, श्री प्रसाद देशमुख, कोष्याध्यक्ष श्री उदय मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.अशी माहिती सोशल मिडिया



प्रसिध्दी प्रमुख महेश कुलकर्णी यांनी कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथून प्रकाशित केले आहे*पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा

# वर्णी महापूजेने श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष महोत्सावास प्रारंभ

## यंदाही मंदिरात आराध्य बसण्यासाठी मंदिर प्रशासनाची तगडी तयारी

**प्रतिनिधी ।** अंबाजोगाई

महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान व अंबाजोगाईचे ग्रामदैवत असलेल्या श्री योगेश्वरी देवीचा मार्गशीर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत साजरा होत आहे. रविवारी सकाळी वर्णी महापूजेने मार्गशीर्ष महोत्सवास प्रारंभ झाला. तहसीलदार विलास तरंगे व सौ मयुरी तरंगे यांनी योगेश्वरी देवीची विधीवत महापूजा केली. या वर्णी महापूजेने या महोत्सवास प्रारंभ झाला.

मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत मंदीर परिसरात सलग नऊ दिवस



आराध्य बसण्याची परंपरा गेल्या अनेक शतकांपासून सुरू आहे. या वर्षी देखील मंदिरात जवळपास ४ ते ५ हजार महिला आराध्य बसणार असल्याची माहिती देवल कमिटीच्या वतीने देण्यात आली. रविवारी सकाळी झालेल्या महापूजेनंतर महिलांची मंदिरात आराध्य बसण्यासाठी गर्दी वाढू लागली होती. शहर वासियांनी योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी मोठ्या रांगा केल्या होत्या. या वेळी झालेल्या महापूजेला तहसीलदार तथा देवल कमिटी चे अध्यक्ष विलास तरंगे,व सौ. मयुरी तरंगे यांनी विधिवत योगेश्वरी देवीची महापूजा व महाआरती केली. यावेळी देवल कमिटीचे सचिव प्रा.अशोक लोमटे, कोषाध्यक्ष शिरीष पांडे, विश्वस्त संजय भोसले,डॉ.संध्या जाधव,अमोल लोमटे,सतीश लोमटे, प्रवीण दामा,हंसराज देशमुख,राजपाल भोसले, देवीचे पुजारी सारंग पुजारी, योगेश्वरी देवीचे पुरोहित,मानकरी व भक्त उपस्थित होते. यावेळी पुरोहितांच्या मंत्रोच्चारात व विधीवत महापूजेनंतर महाआरती झाली. महोत्सवाच्या कालावधीत सलग नऊ दिवस विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन देवल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच आराध्य बसलेल्या सर्व महिलांच्या निवासाची, पाण्याची व त्यांना मूलभूत गरजा पुरवण्यासाठी देवल कमिटीच्या वतीने उपाययोजना आखण्यात आल्या आहेत.

# अंबाजोगाई स्वाराती हॉस्पिटल मधील बनावट औषधा प्रकरणी कडक कारवाई करावी

## उद्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आंदोलन- जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे

**प्रतिनिधी ।** केज

शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई येथील स्वाराती हॉस्पिटल मधील बनावट औषध घोटाळा प्रकरणी सम्पल तपासणी करिता एक वर्ष दिरंगाई का केली ? व बनावट कंपन्यासह स्थानिक हॉस्पिटल प्रशासनावर देखील कडक कारवाई करावी करिता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज दिनांक ९ डिसेंबर रोजी सकाळी ११-०० वाजता उपजिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथे संपर्क नेते सुनील प्रभू,उपनेत्या सुषमाताई अंधारे,उपनेते तथा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर,बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव,लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील धांडे,सहसंपर्कप्रमुख



बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली वजिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देऊन आंदोलन करण्यात येणार आहे तरी केज विधानसभा व परळी विधानसभा मतदार संघा तील शिवसेना,युवासेना, महिला आघाडी पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख रत्नाकर अप्पा शिंदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भारत सरकारच्या नोटरीपदी ॲड. जावळे यांची नियुक्ती

**प्रतिनिधी ।** पाटोदा

भारत सरकारच्या नोटरी पदी पाटोदा येथील पाटोदा न्यायालयाचे विधीज्ञ ॲड. सचिन जावळे यांची नियुक्ती झाली असून केंद्र सरकारच्या विधी व न्याय मंत्रालयाकडून प्रमाणित असलेले पत्र त्यांना प्राप्त झाले आहे. ॲड. सचिन जावळे हे मागील अनेक वर्षांपासून पाटोदा न्यायालयात विधीज्ञ म्हणून



कार्यरत असून त्यांची नोटरी पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे मित्र परिवाराच्या वतीने पाटोदा पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे शेख जिलानी जितेंद्र भोसले वैभव देशमुख अंगद सांगळे महेश बेदरे आजीज शेख शाहरुख पठाण मंगेश नेमाने जितेंद्र सांगळे रिपाईचे तालुकाध्यक्ष डॉक्टर नरेंद्र जावळे जितेंद्र सांगळे लखुळ वीर यांच्यासह मित्र परिवाराकडून अभिनंदन केले जात आहे.




# नरेंद्रजी मोदी परिचारिका प्रशिक्षण संस्था केजयांनी समुह लोकनृत्य प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला

**प्रतिनिधी ।** केज

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्यअंतर्गत जिल्हाक्रीडा अधिकारी कार्यालय बीड, जिल्हा परिषद बीड,नेहरू युवा केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा स्तरीय युवा महोत्सव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय क्रीडा संकुल बीड येथे दिनांक ४ व ५ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न झाल्या.यामध्ये बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी माध्यमिक विद्यालय केज व मा.श्री नरेंद्रजी मोदी परिचारिका प्रशिक्षण संस्था (त्रछच्) केज येथील युवक युवतीं यांनी सहभाग नोंदवून समूह लोकनृत्य यामध्ये जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला असून सदरील स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थी कु. साक्षी कराड,गित्ते शामसुंदर,आडे शिल्पा, चौरे प्रांजली,कांबळे साक्षी,मोरे चैताली,काळे राजनंदिनी,पवार ऋतुजा, बगाडे सचिन,फुंदे प्रांजली हे होते.सत्यम सरवदे हे लोकनृत्य मार्गदर्शक असून या सर्वांना प्रा.डॉ. कविताताई गित्ते मॅडम ड.उद्धवराव(अण्णा) कराड,श्रीमती शेख मॅडम, श्री.चाटे सर,श्रीमतीजोशी मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच कविता लेखन व कथा लेखन या संकल्पना




आधारित कला प्रकारात कु.साक्षी उद्धव राव कराड हिने द्वितीय क्रमांक पटकावला तर वकृत्व स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक कु.साक्षी उद्धव राव कराड यांनी पटकाविला असून सदरील संघाचे व विद्यार्थ्यांची विभागीय स्तरासाठी निवड झाली असून सर्व युवक युवतींना बीड जिल्ह्याचे नेतृत्व करण्यासाठी जिल्हाक्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, संस्थेचे अध्यक्ष ड.उद्धवराव कराड, उपाध्यक्ष राजेश कापसे, विद्यालयाच्या प्राचार्य डॉ.कविताताई गित्ते- कराड मॅडम यांनी विभाग स्तरीय स्पर्धेसाठी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# आजपासून श्री स्वामी समर्थ केंद्रात अखंड नाम जप यज्ञ सप्ताह व सामुदायिक गुरुचरित्र पारायण सोहळा

**प्रतिनिधी ।** वडवणी

दरवर्षी अतिशय नियमबध्द रीतीने श्रीदत्त जयंती सप्ताह साजरा होतो. या सप्ताहातील गुरुचरित्र पारायण सकाळी ८.३० ते १० दरम्यान सामूहिक रीतीने करण्यात येते. तेव्हा इच्छुकांनी पारायण सुरु होण्याच्या १५ मिनिट आधी केंद्रात हजर असणे आवश्यक आहे. याशिवाय सप्ताहामध्ये दररोज २४ तास प्रहरे दिले जातात. सकाळी ८ ते रात्री ८ महिला सेवेकरी व रात्री ८ ते सकाळी ८ पर्यंत पुरुष सेवेकरी प्रहर सेवा रुजू करतील. अशी माहिती श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने देण्यात दिली.

वडवणी : श्रीदत्त जयंतीनिमित्त शहरातील चिंचवण रोड स्थित दिंडोरी प्रणित श्रीस्वामी समर्थ सेवा केंद्रात ९ डिसेंबर पासून अखंड नाम जप, यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून हा सप्ताह दिंडोरी प्रणित श्रीस्वामी समर्थ सेवा केंद्रात वर्षभर होणाऱ्या उत्सवातील सर्वात महत्वाचा उत्सव मानला जातो.दिंडोरी प्रणित अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्गाच्या चिंचवण रोड स्थित श्री स्वामी केंद्रात दरवर्षी सप्ताहात हजारो सेवेकरी उपस्थित रहातात. सप्ताहात सामूहिक गुरुचरित्र पारायण केले जाते, विशेष म्हणजे या पारायणासाठी शेकडो सेवेकरी आपला सहभाग नोंदवितात. ९ डिसेंबर ते १५ डिसेंबर पर्यंत म्हणजेच दत्त जयंती पर्यंत हा सप्ताह साजरा होणार आहे. यामध्ये दररोज सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, ८.१५ नित्य स्वाहाकार, ८.३० ते १० वाजता पर्यंत गुरुचरित्र वाचन, १०.३० ला नैवेद्य आरती, १०.४५ विषेश याग त्यानंतरदुपारच्या सत्रात दुपारी २ ते ५.३० वाजता दुर्गा सप्तशती व श्री स्वामी समर्थ पाठ वाचन, सायंकाळी ६ वाजता औदुंबर प्रदक्षिणा, ७ वाजता विविध विषयांवर मार्गदर्शन आणि ७.३० ला नित्यसेवा व नित्यध्यान केले जाते.

या सप्ताहामध्ये दैनंदिन अध्यात्मिक कार्याशिवाय प्रत्येक दिवशी विशेष याग केले जातात. यामध्ये सप्ताहाच्या प्रथम दिवशी म्हणजेच ९ डिसेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता नित्य स्वाहाकार, मंडल स्थापना, अग्निस्थापना केल्या जाईल. १० डिसेंबर रोजी श्री गणेश याग, ११ डिसेंबर श्री



गीताई याग, १२ डिसेंबर चंडी याग, १३ डिसेंबरश्री स्वामी याग, १४ डिसेंबर श्री रूद्र याग, श्री मल्हारी याग, १५ डिसेंबर रोजी बली पूर्णाहुती व दुपारी १२.३९ वाजता दत्त जन्मोत्सव साजरा केला जाईल. तर १६ डिसेंबर रोजी श्री सत्य दत्त पूजन, देवता विसर्जन, अखंड नाम जप यज्ञ सप्ताह सांगता व सकाळी १०.३० वाजता महाआरती केली जाणार आहे.

९ डिसेंबर पासून १६ डिसेंबरपर्यंत होणारे सर्व याग सकाळी १०.३० वाजता सुरू होतील. तरी दिंडोरी प्रणित अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्गाच्या चिंचवण रोड स्थित श्री स्वामी केंद्रात साजऱ्या होणाऱ्या महाउत्सवात सर्व सेवेकरी परिवारानी तन मन धनाने सहकार्य करावे असे आवाहन श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.



पाली – येथे खंडोबाच्या यात्रेनिमित्त कुस्त्यांची दंगल लावताना पालीचे भावी सरपंच संदीप सखाराम नवले यांच्यासह आदिनाथ लिंबाजी नवले माजी आमदार, उपसरपंच महेंद्र रघुनाथ वीर, पीएसआय भास्कर नवले, ग्रामीण पोलीस स्टेशनचे हवालदार आनंद मस्के, दिलीप लिंबाजी नवले, लक्ष्मण उत्तम नवले, शरद आदिनाथ नवले, शिवाजी विश्वनाथ नवले, भाऊसाहेब खांडेकर, रामदास नवले, दीपक नवले, मुरलीधर राऊत, राजाभाऊ कारगुडे, गपूर शेख, पठाण नासिर रवींद्र वीर , डॉ, दत्तात्रेय साळुंके, प्रशांत वीर यांच्यासह गावकरी मंडळी दिसत आहे.

# खालापूरी येथे कुस्त्यांची दंगल संपन्न

खालापूरी ।प्रतिनिधी

येथे सालाबादाप्रमाणे कुस्त्यांचा हंगामा संपन्न झाला.दूर दूरवरून मल्ल कुस्त्या खेळण्यासाठी येतात.खंडोबा यात्रा निमित्त झालेल्या या दंगली मध्ये महिला कुस्ती खेळाडू पण आल्या होत्या. गावाकऱ्यांच्या वतीन सुरेख नियोजन, शिस्तबद्ध नियोजन करण्यात आलं होत. याप्रसंगी कुस्ती लावताना पंचायत समिती सदस्य माऊली सानप, सामाजिक कार्यकर्ते अजिनाथ गवळी, सरपंच गणेश घोलप, सामाजिक कार्यकर्ते डॉ जितीनदादा वंजारे,बप्पा परजने,वस्ताद दिगंबर गवळी, अमर गवळी,उमेश उगले,इंजिनियर पंढरी परजने,विनायक गवळी,सुहास



खत्री,सोमा डोके,सोहेल शेख,पमुनाना परजने,देशमुख काका,परजने, उगले, भस्मारे, खरपाडे, वंजारे, लोंढे, उगले, सानप, लगास, मुंढे, गवळी, डोके, इत्यादी उपस्तित होते.

# बालसभेचे आयोजन करून गुरुनानक प्राथमिक विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा

**प्रतिनिधी ।** बीड

श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ,सारणी(सां.) ता. केज जि. बीड संचालित गुरुनानक प्राथमिक विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनी विद्यार्थ्यांनी बाल सभा घेऊन महामानवाना अभिवादन केले.क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी संपूर्ण कार्यक्रमाची सूत्रे स्वत:च्या हाती घेत कार्यक्रमात छोट्या आणि मोठ्या अत्यंत महत्वाच्या भूमिका पार पाडल्या.अध्यक्ष,वक्ते,अतिथी, सूत्रसंचालक, आभार इत्यादी सर्वच भूमिका उत्कृष्टरित्या पार पाडल्या.



कार्यक्रमाच्या सुरवातीला शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए.तसेच बाल सभेचे अध्यक्ष अनुष गदळे,प्रमुख अतिथी व मार्गदर्शक ओमसाई गायकवाड,जाधव अमृता,वणवे कृष्णा तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी दीपप्रज्वलन करून प्रतिमा पूजन केले.त्यानंतर हर्षाली चंदनशिव, आडे आराध्या,तनुजा पवार यांनी सावित्रीमाई फुले यांच्या कार्यावर आधारित स्वागत गीत गायले त्यांना श्रीमती हांगे एस.आर. आणि मुंडे एस. व्ही.यांनी मार्गदर्शन केले.बालसभेचे प्रयोजन आणि आवश्यकता श्री तेलप सर यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितली.त्यानंतर प्रमुख वक्त्यांनी महात्मा ज्योतिराव फुले तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्य यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारी उत्स्फूर्त भाषणे केली. यात सैय्यद अशमिरा,शेख राहीन,मुंडे आरती, गदळे अनुश्री यांचा समावेश होता.आंधळे सृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित एका सुंदर कवितेचे गोड आवाजात सुश्राव्य वाचन केले आणि उपस्थितांची वाहवा मिळवली. बाल सभेचे अध्यक्ष अनुष गदळे याने अध्यक्षपदाला साजेल असे भाषण करीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला,अधून मधून प्रश्न विचारून विद्यार्थ्यांचे अवधान खेचून घेतले आणि उपस्थितांची मने जिंकून घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. दुबाले राजनंदीनी आणि शेख मुस्कान हिने केले तर उपस्थितांचे आभार काळे आदित्य याने मानले.मुख्याध्यापकांची कार्यक्रमासाठी परवानगी घेणे,प्रत्येक वर्गात जाऊन बालसभेचे आमंत्रण देणे,अतिथी व मान्यवरांचा सन्मान करणे,कार्यक्रम संपल्यानंतर सुद्धा समान जागच्या जागी ठेवणे ही सगळी कामे मुलांनी अत्यंत आवडीने पार पडली. बाल सभेसाठी खास ठोकरे सरांनी अतिशय सुंदर असे फलक लेखन केले तर तांदळे सरांनी विद्यार्थ्यांना कार्यक्रमाची तयारी करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. जागोजागी महापुरुषांच्या विचारांचे चार्टस् हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण होते यासाठी गदळे सरांनी विद्यार्थ्यांना मदत केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डोंगरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. अशा प्रकारे बालसभा उत्साहात पार पडली आणि मुलांसाठी यावर्षीची बालसभा अविस्मरणीय ठरली.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात संत शिरोमणी संताजी जगनाडे यांची जयंती उत्साहात साजरी

**प्रतिनिधी ।** लातुर

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, जयंती महोत्सव समिती द्वारा संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, डॉ. राहुल डोंबे, विनायक लोमटे, यशपाल ढोरमारे, संस्थेचे कर्मचारी सुभाष गलगले, गुरुप्रसाद बिराजदार, योगीराज माकणे, संगमेश्वर मुळे आणि नंदू काजापुरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्रातील संतांनी सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र करून महाराष्ट्रात अध्यात्मिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या शिष्य परिवारातील संताजी जगनाडे हे एक टाळकरी होते. तुकाराम महाराजांचा संताजींवर प्रभाव होता. तुकाराम महाराज अभंग रचना करत होते आणि त्यांचे लेखनीस होण्याचा बहुमान संताजी जगनाडे यांना मिळाला सनातन्यांनी तुकोबाची गाथा इंद्रायणीत बुडवल्यानंतर संताजी महाराजांना मुखोद्गत असणाऱ्या सर्व अभंगाचे पुनर्लेखन करण्याचे काम त्यांनी केले त्यामुळे तुकारामाचे अभंगाचे तारणहार म्हणून संत संताजी जगनाडे




यांना ओळखले जाते. संतानी मानवी कल्याणाचे कार्य, विचार आणि तत्त्वज्ञान पुढच्या पिढीला माहीत व्हावे याकरिता शासनाने चालवलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून त्यानिमित्ताने अनेक थोर महात्म्यांची ओळख समाजाला होते असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विनायक लोमटे यांनी मानले.

# हात-पाय गमावलेल्यांना मिळणार मोफत हात-पाय!

## बीडमध्ये २२ डिसेंबरला मोफत वाटप

**प्रतिनिधी ।** बीड

देशभक्त पद्मश्री रत्नाप्पा कुंभार यांच्या स्मृतीदिनामित्त बीड येथे २२ व २३ डिसेंबरला मोफत कृत्रिम हात व पाय वाटप आणि नेत्ररोग शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती रामदास कुंभार यांनी दिली. देशभक्त पद्मश्री रत्नाप्पा कुंभार यांच्या स्मृतीदिनामित्त कुंभार समाज विकास संस्था, बीड. व साधु वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर होत आहे. हात व पाय गमावलेल्या दिव्यांग बांधवांसाठी अद्यावत टेक्नॉलॉजीव्दारे व उच्च दर्जाच्या फायबरपासून बनविलेले तसेच अत्यंत हलके व मजबूत कृत्रिम हात व पाय यांचे मोफत वाटप या शिबिरात होणार आहे. २२ डिसेंबर रोजी केले आहे. शिबिराच्या दिवशी पायाची व हाताची मापे घेतली जातील. माप घेतल्यानंतर ३० ते ३५ दिवसानंतर अवयव वितरण केले जाणार आहे. हे कृत्रिम हात व





पाय लावल्यानंतर मनुष्य चालू शकतो, सर्व दैनंदिन कामे करु शकतो. जिनासुध्दा चढू शकतो, सायकल सुध्दा चालवू शकतो. तरी गरजूंनी व त्यांच्या नातेवाईकांनी २२ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत हॉटेल ग्रँड यशोदा, राष्ट्रवादी काँग्रेस भवनासमोर, बार्शी नाका रोड, बीड येथे उपस्थित राहावे.

तसेच कुंभार समाज विकास संस्था, बीड व श्री. आनंदऋषीजी हॉस्पीटल, मेडिकल रिसर्च सेंटर अहिल्यानगर (अहमदनगर) यांच्या संयुक्त विद्यमाने २३ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत बीड येथील हॉटेल ग्रँड यशोदा येथे मोफत नेत्ररोग तपासणी शिबीर होणार आहे.या दोन्ही शिबिरांसाठी नाव नोंदणी आवश्यक असून त्यासाठी रामदास कुंभार ९८६०५७२३८३ व चनबस वायकर ९८२२४८१३८२ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.



बीड – दि.२/१२/२०२४ रोजी बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी निता अंधारे मॅडम यांना विविध निवेदने दिली.मात्र त्या निवेदनाची दखल घेत नसल्यामुळे तसेच माहिती अधिकारात केलेले अर्ज निकाली काढत नसल्यामुळे सनी वाघमारे यांनी बीड नगर परिषद मुख्याधिकारी यांच्या दालनात त्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी माता सावित्रीमाई फुले यांची प्रतिमा घेऊन जात अनोखे आंदोलन केले.

# माजी मंत्री जयदत्तजी क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयात विविध कार्यक्रम संपन्न

**प्रतिनिधी ।** शिरूर कासार

आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित पाडळी उच्च माध्यमिक विद्यालय पाडळी तालुका शिरूर कासार येथे माजी मंत्री संस्थेचे सचिव माननीय जयदत्तजी क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धा आरोग्य शिबीर रक्तदान शिबिर मुलांना वाटप खाऊ आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य अगंदराव दहिफळे होते तर प्रमुख अतिथी सरपंच गहिनाथ पाखरे उपसरपंच रामकिसन इंगळे माजी सरपंच प्रकाश इंगळे चेअरमन भगवान पाखरे ऋषीकेश राऊत विनोद कंठाळे देविदास कंठाळेआशोक इंगळे बाळासाहेब वालेकर बाळासाहेब कंटाळे राहुल सरवदे आदींची उपस्थिती होती कार्यक्रम प्रसंगी



सरपंच गहिनाथ पाखरे प्राचार्य दहिफळे पर्यवेक्षक दीपक रत्नपारखी आशोक इंगळे आदींनी जयदत्तजी क्षीरसागर यांच्या जीवन व समाज कार्यावर मनोगत व्यक्त केले डॉ. सुनील नागरगोजे व डॉक्टर शिवानी कछवा यांच्या टीमने रक्तदान शिबिर पार पाडले प्रशांत सानप उमेश सानप धर्मराज मुंडे प्रजोत राख ऋषिकेश राऊत आदेश इंगळे बालाजी हंगे आदींनी रक्तदान करून समाजकार्याचा मोठा वाटा उचलला या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मारुती धांडे यांनी केले तर आभार ज्ञानोबा मुंडे यांनी मानले या कार्यक्रमास सर्व कर्मचारी ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5



## जीवन शिक्षण विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा

**प्रतिनिधी । धारूर**

धारूर तालुक्यातील असोला येथील जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालय आसोला विद्यालयात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक धनराज घुगे हे तर प्रमुख पाहुणे म्हणून सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मराठी हिंदी इंग्रजी भाषेमध्ये आपले मनोगत उत्तम प्रकारे व्यक्त केले.

# जामखेड सौताडा रोडवर चालत्या चारचाकी वाहनाने घेतला पेट, गाडी जळुन खाक

**प्रतिनिधी । जामखेड**

बीड वरुन जामखेड मार्गे नगरकडे जाणार्या चालत्या चारचाकी वहाणाने जामखेड सौताडा रोडवरील मोहा शिवारात अचानक पेट घेतला. घटनास्थळी पोलिसांच्या मदतीने नगरपरिषदेच्या अग्नीशमन गाडीने आग विझवण्यात आली मात्र तोपर्यंत सर्व गाडी जळुन खाक झाली होती.याबाबत पोलीसांन कडुन मिळालेली माहिती अशी की शनिवार दि ७ डिसेंबर रोजी वहानचालक जयदीप संपतराव सुरवसे रा. बीड. गाडी क्रमांक एम. एच ४६ एक्स २२६८ या चारचाकी वहानातुन आपल्या कामानिमित्त बीड वरुन नगरकडे रत्नागिरी या ठिकाणी चालले होते. यावेळी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास त्यांची गाडी जामखेड सौताडा रोडवरील मोहा शिवारातुन चालली होती. यावेळी समोरुन येणाऱ्या एका ट्रॅक्टर चालकास या गाडीच्या बोनेटच्या बाजुने जाळ निघत आल्याचे लक्षात आले. त्याने ही माहिती आत बसलेल्या चालक जयदीप सुरवसे यांच्या लक्षात आणून दिली. यानंतर सुरवसे हे तातडीने गाडीतुन खाली उतरले त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र गाडीतील डीझेल मुळे या गाडीने मोठ्या प्रमाणात पेट घेतला. ही घटना जामखेड पोलीस स्टेशनला समजताच पो. कॉ. प्रविण इंगळे पळसे देवा, ज्ञानेश्वर बेलेकर पो. ना. सरोदे, मांडगे, घोळवे यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांच्या मदतीने नगरपरिषदेच्या अग्नीशमन गाडीने आग आटोक्यात आणली मात्र तोपर्यंत पुर्ण गाडी जळुन खाक झाली. यानंतर जामखेड सौताडा रोडवर मोठ्या प्रमाणात ट्रॉफीक जाम झाले होते. घटनास्थळी मोहा येथिल माजी सरपंच शिवाजी डोंगरे व ग्रामस्थांनी पोलिसांना हवातुक सुरळीत करण्यास मदत केली.

गाडी चालक जयदीप सुरवसे यांनी सदरची गाडी तीन महिन्यांपूर्वीच विकत घेतली होती. २०१३ सालची ही गाडी आहे. ते आपल्या कामा निमित्त एकटेच



रत्नागिरी या ठिकाणी चालले होते. सदरची आग गाडीतील वायरींगच्या शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र समोरुन येणाऱ्या ट्रॅक्टर चालकाने ही घटना निदर्शनास आणून दिल्याने याचालकाचे प्राण वाचले व सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही.

# परळीला ऊर्जा खातं मिळण्याची शक्यता?

## लवकरच मंत्रिमंडळाचा विस्तार ; मुंडे बहीण भावाच्या रुपाने परळीला दोन लाल दिवे मिळणार

परळी / प्रतिनिधी

महाराष्ट्रात नुकतेच नवनिर्वाचित सरकार स्थापन झाले असून मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांनी शपथ घेतली आहे. परंतु उर्वरित मंत्रिमंडळ लवकरच स्थापन होणार असून धनंजय मुंडे यांना मात्र ऊर्जा मंत्रालय मिळणार असल्याचे माहिती विश्वासनीय सूत्राकडून मिळाली आहे.

राजकीय इतिहासात पहिल्यांदाच परळी मध्ये दोन कॅबिनेट मंत्रीपद मिळणार हे जवळपस निश्चित झाले आहे. स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी दूरदृष्टी ठेवून राजकारणात जे पेरलं होतं ते आज उगवत असल्याचं सर्वांनाच अनुभवायला मिळत आहे. स्वर्गीय मुंडे साहेबांची राजकारणातील दूरदृष्टी किती प्रगल्भ होती याची अनुभूती आता बीड जिल्ह्याला आणि



विशेषतः परळीकरांना होताना दिसत आहे. नुकताच राज्य मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांनी शपथविधी घेतला तर उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथराव शिंदे आणि अजित दादा पवार यांनी पदाची शपथ घेतली परंतु उर्वरित मंत्र्यांचा शपथविधी ११ डिसेंबर रोजी होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे मागील सरकारमध्ये असलेल्या काही मंत्र्यांना डूच्छू दिला जाण्याची शक्यता आहे. तर अनेक जिल्ह्याला सादर राज्यमंत्रीपद सुद्धा मिळणार नाही असे असतानाच परळी मतदारसंघ आणि येथील जनता खरोखरच भाग्यशाली असून स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यानंतर एकाच घरात आणि बहिण भाऊ हे दोघेही कॅबिनेट मंत्री होणार हे जवळपास निश्चित झाले आहे. धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय आणि विशेष मंत्रालयाच योग्य पद्धतीने चालवला त्यानंतर कृषी मंत्री म्हणून सुद्धा त्यांनी चांगली कामे केली. तर त्यापूर्वी पंकजा मुंडे यांनीही महिला बालकल्याण आणि ग्रामविकास मंत्रालयाचा कारभार चांगल्या पद्धतीने चालवून राज्याच्या राजकारणात दोघाही बहीण भावांनी चांगला ठसा निर्माण केला आहे. यावेळेसही दोघांनाही चांगली मंत्रालय मिळण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे आमदार धनंजय मुंडे यांना ऊर्जा मंत्रालय मिळण्याची शक्यता असल्याची माहिती विश्वासने सूत्राकडून मिळाली आहे आणि स्वतः धनंजय मुंडे हेही या मंत्रालयासाठी ॲग्रेसिव्ह असल्याचेही समजले आहे. धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांना नेमके कोणत्या खात्याची जबाबदारी त्यांच्यावर पडते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अंबाज़ोगाईच्या शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या जिवाशी चाललेला खेळ थांबवा

## बोगस औषध पुरवठा प्रकरणाची एसआयटी चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करा-राजेभाऊ फड

**परळी ।प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे जवळपास तीन जिल्ह्यातील गोरगरीब जनतेसाठी जीवनदायी रुग्णालय आहे. दररोज हजारो रुणावर येते उपचार होतात. याच रुणालयात बोगस औषधाचा पुरवठा सुरू असल्याची बाब नुकतीच उघड झाली. याबाबत पोलिसात गुन्हाही नोंद झालेला आहे. मात्र एवढ्यावर हे प्रकरण न थांबता त्याच्या मुळाशी जाणे अत्यंत आवश्यक आहे सदैव प्रकरण हे गंभीर असून याची पाळी मुळे राज्यात इतर ठिकाणी असू शकतात प्रशासकीय यंत्रणेतील अनेक बड्या लोकांचे यात हात हसण्याचे तात शक्यता आहे. म्हणून या प्रकरणाची उच्चतरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. अंबाजोगाई येथील स्वामी राम रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात बोगस औषधाचा पुरवठा होत असल्याचे तर करत अत्यंत गंभीर आहे शासनाने नेमून दिलेल्या औषध पुरवठा कंट्रकदाराने बनावट औषधाचा पुरवठा केल्याचे अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले. याबाबत अंबाजोगाई पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील बोगस औषध पुरवठा प्रकरणात गुजरात आणि ठाणे जिल्ह्याचे कनेक्शन असून ही टोळी राज्यात आणि आंतरराज्यात सक्रिय असण्याची दाट शक्यता आहे. गोरगरीब रुणाच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. गोरगरीब रुग्णांना खाजगी दवाखान्यात उपचार घेणे परवडत नाही. त्यांच्यासाठी हे शासकीय रुग्णालय वरदान ठरत असतात .तिथे असे प्रकार उघडशी उघड किस होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. शासकीय यंत्रणेत अशा स्वरूपाचा भ्रष्टाचार ही नक्कीच आदर येणारी बाब असून. यातील सर्व दोषींची सखोल चौकशी व्हावी आणि त्यांना कठोर शिक्षा करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. उच्चतरीय चौकशी करा. स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बोगस औषध औषधाचा पुरवठा होणे गंभीर आणि निंदनीय बाब आहे. या गैरप्रकारच्या अनेकांचा हात असल्याची शक्यता आहे. सदरील शासकीय औषध पुरवठा कंटाळा आला कुणाच्या शिफारशीनुसार कंत्राट देण्यात आले ?. हा कॉन्ट्रॅक्टदार कुठून औषध उपलब्ध करत होता? कोणत्या कंपनीशी त्यांचे हितसंबंध आहेत? जिल्ह्यातील कोणते शासकीय अधिकारी सहभागी आहेत? यांची निपक्ष चौकशी होऊन तो ईश्वर कठोर कारवा होणे आवश्यक आहे. त्यासाठी एसआयटी पथक नेमणूक या प्रकरणाचे पाळेपुळे शोधावे व दोषींना शिक्षा करावी अशी मागणी राजेभाऊ फड यांनी केली आहे.





लोकनेते माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक केशव भांगे ,मारुती वाघ ,रामचंद्र बहीर, गणेश ससाणे आदि उपस्थित होते.

## लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात संत श्री संताजी जगनाडे महाराजांची जयंती साजरी

लिंबागणेश: बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.०८ रविवार रोजी संत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रगतिशील शेतकरी सुदाम रणखांब यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत कर्मचारी जीवन मुळे, सुखदेव वाणी, कचरू निर्मळ,मधुकर रणखांब, जयदेव गिरे, शेषेराव थोरात आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मधुकर रणखांब यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष बालासाहेब जाधव यांनी आभार मानले.

संत संताजी जगनाडे महाराजांचे वारकरी संप्रदायाचे विचार आणि साहित्य प्रेरणादायी ; सामाजिक बांधिलकी जपत ऐक्याचा संदेश देणारे




:- डॉ.गणेश ढवळे

श्री संत संताजी जगनाडे यांच्या महतीचा जीवनपट उलगडताना त्यांचे वारकरी संप्रदायाचे विचार आणि साहित्य हे प्रेरणादायी असुन सामाजिक बांधिलकी आणि ऐक्याचा संदेश देणारे आहे.जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या जीवनकार्याचा मोठा प्रभाव त्यांच्या मनावर होता.तुकाराम महाराजांच्या किर्तनातील प्रमुख १४ टाळक-यांपैकी प्रमुख असणारे संताजी जगनाडे महाराज यांना तुकाराम महाराजांच्या गाथा इंद्रायणी नदीमध्ये बुडवल्यानंतर सुद्धा त्याचे पुन:र्लेखन जगनाडे महाराजांनी केल्याने आपणास त्यांची महती कळत असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी प्रतिपादन केले.

# पुण्यातील आयुर्विमा महामंडळ कार्यालयासमोर पुणे विभागातील विमा प्रतिनिधींचे

## १७ डिसेंबरला सत्याग्रह आंदोलन होणार- प्रमोदकुमार छाजेड

**तलवाडा ।प्रतिनिधी**

भारतीय आयुर्विमा महामंडळाने जुन्या सर्व योजना बंद केल्या असून मार्केटमध्ये विक्रीसाठी आणलेल्या नवीन योजनांमध्ये अनेक किचकट तरतुदी, काही संभाव्य तरतुदी, त्रुटींमुळे विमाप्रतिनिधींना अडचणीचे ठरत आहे. नवीन तरतुदींमुळे योजना ग्राहकांना फायदेशीर आहे ही चांगलीच गोष्ट आहे पण विमा प्रतिनिधींना मात्र त्या तरतुदी घातक आहेत याबाबत पुणे येथील भारतीय आयुर्विमा महामंडळाला देखील निवेदन देऊन घातक असलेल्या परिपत्रकाचा विरोध संपूर्ण देशभर विमा प्रतिनिधी करीत आहेत त्या अनुषंगाने मंगळवार दिनांक१७ डिसेंबर रोजी पुणे येथे विभागीय कार्यालया समोर सत्याग्रह आंदोलन नगरचे विमा प्रतिनिधी करणार आहे.अशी माहिती ऑल इंडिया लाइफ इन्शुरन्स एजंटस् फेडरेशन ऑफ इंडिया पुणे विभागाचे विभागीय संघटक सचिव प्रमोदकुमार छाजेड यांनी दिली. याबाबत श्री छाजेड यांनी तसे निवेदन नुकतेच पुणे विभागीय कार्यालयाला दिले असून त्यामध्ये त्यांनी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की



विमा प्रतिनिधी यांनी पॉलिसी विक्री केल्यानंतर जर ग्राहकाना काही अडचणीमुळे पुढील वर्षाचे हप्ते न भरल्यास व पॉलिसी सरेंडर केल्यास विमा प्रतिनिधीला दिलेले कमिशन पुन्हा वसुल करण्याची घातक तरतूद करण्याचा छुपा अजेंडा घेवून आयुर्विमा महामंडळ काम करत आहे, अशी आमची भावना झाली असून तसा स्पष्ट उल्लेख या परिपत्रकात जरी नसला तरी पडद्यामागून या हालचाली चालू असल्याच्या दिसून येत आहेत.

आयुर्विमा महामंडळाच्या आजपर्यंत झालेल्या लौकिकामध्ये सर्वात मोठे योगदान माझ्या सारख्या असंख्य विमाप्रतिनिधी बंधु भगिनींनी दिलेले आहे. याचा मला सार्थ अभिमान असून नव्याने चालु असलेल्या हालचाली पाहता आपल्या योजना ग्राहकांसाठी आकर्षक अशा चांगला बोनस देणा-या आयुर्विमा महामंडळाने विक्री साठी काढाव्यात व विमा प्रतिनिधींना एक आर्थिक स्थैर्य पुर्वीप्रमाणे प्राप्त होण्यासाठी कमिशन दरामध्ये बदल न करता, तसेच दिलेले कमिशन वसुलीबाबत असे कुठलेही विमा प्रतिनिधीसाठी घातक असलेले निर्णय घेण्यात येवू नये तसे स्पष्टपणे लेखी पत्रासह आश्वासन मिळावे. हि मागणी मी विमा प्रतिनिधींच्या वतीने आपणाकडे करत आहे. असे निवेदनात नमूद करुन पुणे विभाग १ मधील विमा प्रतिनिधी काही प्रातिनिधीक स्वरुपात आपल्या कार्यालयसमोर दिनांक १७/१२/२०२४ रोजी उपस्थित राहून सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत सविनय सत्याग्रह आंदोलन करणार आहेत. असा इशारा दिला.तरी कृपया याची नोंद घेवून आमच्या विमा प्रतिनिधींच्या भावना सन्माननीय चेअरमन वरिष्ठांना आपल्या मार्फत कळविण्यात याव्यात की जेणेकरुन सत्याग्रह करण्याची वेळ येणार नाही. आम्हाला न्याय मिळेल. अशी अपेक्षा प्रमोदकुमार छाजेड यांनी व्यक्त केली आहे.